## तो आणि ती

तो वर्ग ती तुकडी
तो ओरडा ती दटावणी
तो विकास ती प्रगती
तो अभ्यास ती शिकवणी

तो झरा ती झुळझुळ
तो सागर ती सरिता
तो आवाज ती शीळ
तो मुक्तछंद ती कविता

तो दगड ती शिळा
तो घोटाळा ती चूक
तो पाऊस ती रिमझिम
तो वारा ती झुळूक

तो राग ती भुणभुण
तो माज ती शक्ती
तो तरंग ती लाट
तो आकार ती आकृती

तो वणवा ती ठिणगी
तो डोंगर ती टेकडी
तो आचार ती कृती
तो प्रश्न ती कोडी

तो रोख ती नजर
तो दिवा ती दिवटी
तो माणूस ती व्यक्ती
तो डोळा ती दृष्टी

तो उशीर ती धांदल
तो आस्वाद ती चव
तो संताप ती चिडचिड
तो विचार ती जाणीव

तो व्यापार ती सेवा
तो छंद ती आवड
तो पैसा ती कमाई
तो वेळ ती सवड

तो रस्ता ती वाट
तो प्रवास ती भटकंती
तो वेग ती गती
तो अनुभव ती अनुभूती

तो मोह ती वासना
तो खेळ ती क्रीडा
तो विळखा ती मिठी
तो त्रास ती पीडा

तो व्रण ती जखम
तो उसासा ती संवेदना
तो भोग ती वेदना
तो प्राण ती चेतना

तो देह ती काया
तो परिणाम ती परिणीती
तो आजार ती व्याधी
तो मोक्ष ती सद्गती

**---संध्या रानडे**